**<u>ठळक बातम्या</u>**

- मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेनचं काम वेगाने होत असून लौकरच या दोन शहरातलं अंतर केवळ २ तास ७ मिनिटांवर येईल, असं रेल्वे मंत्र्यांचं प्रतिपादन

- विदर्भातली खनिजसंपत्ती, वन उत्पादनं, कापूस उद्योग या जमेच्या बाजू लक्षात घेऊन उद्योजकांना पुढाकार घेण्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं आवाहन

- खराब हवामानामुळे अमरनाथ यात्रा यंदा वेळे आधीच स्थगित

- उत्तरप्रदेशात रस्ते अपघातात अकरा जणांचा तर आंध्रप्रदेशात खाणीतले दगड कोसळून सहा कामगारांचा मृत्यू

**आणि**

- भारत-इंग्लंड कसोटी मालिकेतल्या अखेरच्या सामन्यात भारतासमोर सामन्यासह मालिका गमावण्याचंही संकट

**<><><><><>**

मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेनचं काम वेगाने होत असून लौकरच या दोन शहरातलं अंतर केवळ २ तास ७ मिनिटांवर येईल असं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. गुजरातमधे भावनगर रेल्वे स्थानकात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

**- - होल्ड - बाईट- अश्विनी वैष्णव - -**

भावनगर ते अयोध्या या साप्ताहिक गाडीला वैष्णव यांनी हिरवा झेंडा दाखवला. पुण्याहून मध्यप्रदेशातल्या रिवा कडे जाणाऱ्या तसंच जबलपूर ते रायपूर या गाडीचं उद्घाटनही त्यांनी दूरस्थ पद्धतीनं केलं. गेल्या अकरा वर्षात ३४ हजार किलोमीटरचे नवे रेल्वेमार्ग तयार झाले असून भारतीय रेल्वेचं मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे, असं ते यावेळी म्हणाले. देशातल्या तेराशे रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास प्रकल्प

हा जगातला सर्वात मोठा प्रकल्प असल्याचंही त्यांनी सांगितलं. मुंबई ते अहमदाबाद ही भारतातील पहिली बुलेट ट्रेन लवकरच सुरू होणार असल्याचंही वैष्णव म्हणाले.

**<><><><><>**

विदर्भातली खनिजसंपत्ती, वन उत्पादनं, कापूस उद्योग या जमेच्या बाजू विकासाच्या दृष्टीनं लक्षात घेऊन उद्योजकांनी पुढाकार घ्यावा, त्याकरता केंद्र आणि राज्य सरकार सर्वतोपरि सहकार्य करेल, असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं आहे. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज या उद्योजक संघटनेच्या विदर्भ विभागीय कार्यालयाचं उद्घाटन केल्यानंतर ते आज नागपुरात बोलत होते. रायपूर ते विशाखापट्टणम हा महामार्ग पूर्णत्वास जात असताना गडचिरोली त्याला जोडल्यास आंध्रप्रदेशातली बंदरं विदर्भासाठी अधिक जवळची ठरतील असं ते म्हणाले. देशात मालवाहतुकीवरचा खर्च पूर्वी १६ टक्के होता. चांगल्या रस्त्यांमुळे तो आता १० टक्क्यांवर आला आहे आणि भविष्यात तो ९ टक्क्यांवर आणण्याचा आपला प्रयत्न असल्याचं गडकरी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज राष्ट्रपती भवनात जाऊन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. बिहारमधे मतदारयाद्यांचं सखोल पुनरिक्षण या मुद्द्यावरुन संसदेत विरोधी पक्ष कामकाज होऊ देत नसल्याबद्दल या भेटीत चर्चा झाल्याचं समजतं. राष्ट्रपती भवनाच्या समाजमाध्यम खात्यावर ही माहिती दिली आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधल्या कुलगाम जिल्ह्यात आज सलग तिसऱ्या दिवशीही सुरक्षा दलाची शोध मोहीम सुरु आहे. यादरम्यान दहशतवाद्यांबरोबर झालेल्या चकमकीत आज आणखी एक दहशतवादी ठार झाला. या चकमकीत आतापर्यंत एकूण तीन दहशतवादी ठार झाले आहेत. शुक्रवारी रात्री ८ वाजता देवसरमधे अखलच्या जंगलात चार ते पाच दहशतवादी लपल्याची माहिती मिळाल्यावर

लष्कराच्या ९ राष्ट्रीय रायफल्सनं जम्मू-काश्मीर पोलीस आणि सीआरपीएफ जवानांसह शोध मोहीम सुरू केली आहे, अशी माहिती लष्करी कारवाईशी संबंधित एका अधिकाऱ्यानं दिली आहे. दहशतवादी लपल्याची शक्यता असलेल्या ठिकाणी उच्च तंत्रज्ञान आधारित पाळत यंत्रणा तैनात करण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

फिलीपिन्सचे राष्ट्राध्यक्ष फर्डिनांद आर मार्कोस ज्युनियर पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. नवी दिल्लीत उद्या दुपारी त्यांचं आगमन होईल. त्यांच्या पत्नी लुईस अरानेता मार्कोस आणि कॅबिनेट मंत्र्यांचं शिष्टमंडळ त्यांच्यासोबत असेल. या दौऱ्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मार्कोस यांच्यात द्विपक्षीय चर्चा होईल. तसंच राष्ट्राध्यक्ष मार्कोस राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेतील. फिलीपिन्सला परतण्याआधी मार्कोस बंगळुरूला भेट देणार आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रात आज अवयवदान पंधरवड्याला प्रारंभ झाला आहे. अवयवदान व्यापक समाज चळवळीचे पाऊल या अनुषंगानं राज्याच्या सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागातर्फे राज्यभर हा उपक्रम राबवला जात आहे.

राज्याचे आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज अवयवदानाचा अर्ज केला आणि सर्वांना अवयवदान करण्याचं आवाहन केलं.

**<><><><><>**

वार्षिक अमरनाथ यात्रा प्रतिकूल हवामान आणि खराब रस्ते या कारणांमुळे आजपासून स्थगित करण्यात आली आहे. ही यात्रा ९ ऑगस्ट रोजी समाप्त होणार होती. तीन दिवसांपूर्वी मुसळधार पावसामुळे यात्रा तात्पुरती थांबवण्यात आली होती. मात्र बालताल आणि पहलगाम या दोन्ही मार्ग यात्रेसाठी सुरक्षित नसून या मार्गांवरून यात्रा पुन्हा सुरू होणार नसल्याची घोषणा काल अधिकाऱ्यांनी केली. यावर्षी सुमारे चार लाख यात्रेकरूंनी अमरनाथ गुहेचं दर्शन घेतलं आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात गोंडा इथं आज सकाळी झालेल्या अपघातात ११ जणांचा मृत्यू झाला तर चार जण जखमी झाले आहेत. पृथ्वीनाथ मंदिरात जाणाऱ्या १५ भाविकांनी भरलेल्या एक बोलेरो गाडीवरचं चालकाचं  नियंत्रण सुटल्यानं ती रेहरा गावातल्या शरयू कालव्यात पडली. या कालव्यातून ४ जणांना सुखरुप बाहेर काढण्यात आलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या अपघातात झालेल्या जीवितहानीबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

आंध्र प्रदेशातल्या बापटला जिल्ह्यात आज सकाळी ग्रॅनाइटच्या एका खाजगी खाणीत काठावरचे मोठे दगड कोसळल्यानं झालेल्या अपघातात किमान ६ कामगारांचा मृत्यू झाला आणि ८ जण गंभीर जखमी झाले. मृतांमध्ये ओदिशामधल्या स्थलांतरित कामगारांचा समावेश आहे. खाणीचा काठ कोसळला तेव्हा खाणीत १५ ते २० कामगार काम करत होते.  पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरु केलं आणि जखमींना रुग्णालयात दाखल केलं. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू यांनी या दुर्घटनेबद्दल खेद व्यक्त केला. तसंच, बचावकार्य तातडीनं पूर्ण करून जखमींवर वैद्यकीय उपचार सुरु करण्याच्या सूचना दिल्या. या दुर्घटनेच्या कारणांचा शोध घेण्यासाठी तपास सुरु करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

**<><><><><>**

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या आणि अखेरच्या सामन्यात आज चौथ्या दिवसाचा खेळ सुरू असून भारतासमोर सामन्यासह मालिका गमावण्याचं संकट आहे.

या सामन्यात भारतानं दुसऱ्या डावात इंग्लंडसमोर विजयासाठी ३७४ धावांचं आव्हान ठेवलं आहे. या आव्हानाचा पाठलाग करताना इंग्लंडनं आपला दुसरा डाव कालच्या १ बाद ५० धावांवरून पुढे सुरू केला. सकाळच्या सत्रात बेन डकेट आणि ऑली पोप यांना बाद करत भारतानं इंग्लंडला अडचणीत आणलं. पण त्यानंतर शतकवीर  हॅरी ब्रुक आणि अर्धशतकवीर जो रुट यांनी दमदार दीड शतकी भागिदारी करत इंग्लंडचा डावा सावरला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा इंग्लंडच्या दुसऱ्या डावात ३ बाद २८६ धावा झाल्या होत्या. त्यांना विजयासाठी अजूनही ८८ धावांची गरज आहे.

**<><><><>**

मणिपूरमध्ये सुरक्षा दलांनी गेल्या २४ तासांत अतिरेकी संघटनांशी संबंधित आणि अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या पाच जणांना अटक केली आहे. या कारवाईत कांगलेइपाक कम्युनिस्ट पार्टी या अतिरेकी संघटनेचा म्होरक्या अमरजित सिंह उर्फ नोनो याला अटक करण्यात आली आहे. सिंह याच्यावर महिलांवर अत्याचार करणं, खंडणी, अपहरणासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याखेरीज या संघटनेच्या अन्य दोन जणांना अटक करण्यात आली आहे. त्याखेरीज चुराचांदपूर आणि कांगपोकपी या जिल्ह्यांमधून दोन जणांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून सुमारे साडे पाच किलो वजनाचे अंमली पदार्थ, २३ हजार रुपये रोख आणि १४ मोबाईल फोन जप्त करण्यात आले.

**<><><><>**

ऑस्ट्रेलियात सिडनीमध्ये आज पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ रॅली काढली गेली. या रॅलीत विकिलीक्सचे संस्थापक ज्यूलियन असांज, सिडनीच्या महापौर क्लोव्हर मूर आणि निवृत्त फुटबॉलपटू क्रेग फॉस्टर देखील सहभागी झाले होते. पॅलेस्टिनला देश म्हणून मान्यता द्यावी अशी मागणी आंदोलकांनी केली. मेलबर्नमध्येही याच मागणीसाठी सुमारे २५ हजार नागरिकंनी मोर्चा काढला.

दक्षिण आफ्रिकेतल्या केप टाउनमध्येही मदर्स फॉर गाझा या चळवळीतल्या महिला सदस्यानेही गाझामधल्या हत्या आणि उपासमारीच्या संकटाविरोधात निदर्शनं करत इस्रायलवर कारवाई करायची मागणी केली.

**<><><><><>**

रशियात ‘कामचटका’ द्वीपकल्पात असलेल्या ‘क्रॅशेनिनिकोव्ह’ या ज्वालामुखीचा आज उद्रेक झाला. गेल्या ६०० वर्षांत झालेला हा पहिलाच उद्रेक आहे. या उद्रेकामुळे समुद्रसपाटीपासून ४ किलोमीटर उंचीवर राखेचे ढग तयार झाले असून या परिसरातून जाणाऱ्या विमानांना धोक्याचा इशारा देण्यात आला आहे. या उद्रेकाचा संबंध काही दिवसांपूर्वी या भागात झालेल्या भूकंपाशी असण्याची शक्यता शास्त्रज्ञांनी वर्तवली आहे.

**//<><><><><>//**